





# मोरारजी मिलला भीषण आग

## कोट्यवधींचे साहित्य जळून खाक

नागपूर / प्रतिनिधी

बुटीबोरी येथील पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रात असलेली आणि देश-विदेशात कपडा निर्यात करणाऱ्या मोरारजी टेक्सटाईल्स कंपनीला लागलेल्या आगीत करोडो रुपयांचे साहित्य जळून खाक झाले आहे. ही घटना मंगळवारी सकाळी ७.३० वाजताच्या सुमारास घडली. बऱ्याच प्रयत्नानंतर ही आग आटोक्यात आणण्यात आली.

कारखान्याच्या कार्यालयातून धूर येत असल्याचे सकाळी येथे कार्यरत असलेल्या सुरक्षारक्षकांच्या लक्षात आले. लगेच या घटनेची माहिती कारखान्यातील वरिष्ठ अधिकारी, बुटीबोरी पोलिसांना आणि अग्निशमन विभागाला देण्यात आली. पाहता पाहता आगीने रौद्ररूप धारण केले. कंपनी बरीच लांब असल्याने सकाळी ८ वाजता एमआयडीसी अग्निशमन विभागाचे अधिकारी घटनास्थळावर पोहोचले व त्यांनी आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न केले. अग्निशमन दल पोहोचण्यापूर्वी येथील काही कर्मचाऱ्यांनी आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. यावेळी कंपनीत आग विझविण्यासाठी ठेवण्यात आलेल्या सिलेंडरचा वापर करण्याचा प्रयत्न केला. परंतु कालबाह्य झालेल्या सिलेंडरचा उपयोग होऊ शकला नाही. अखेर कर्मचाऱ्यांनी सिलेंडर जमिनीवर आदळून त्याचे सील फोडून आग विझविण्याचे प्रयत्न चालविले, मात्र ते अपयशी ठरले. साफसफाई नसल्याने कंपनीतील विहिरींमधील पाणी काळे झाले आहे. याचाही उपयोग आग विझविण्यासाठी होऊ शकला नाही. परंतु आग मोठ्या प्रमाणात असल्याने हिंगणा एमआयडीसी, ▶▶ पान ४ वर....

## मोरारजी मिलला भीषण आग

बुटीबोरी एमआयडीसी, इंडोरामा कंपनी व नागपूर येथील अग्निशमन दलास बोलाविण्यात आले. ही आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन विभागाला जवळपास सहा तास प्रयत्न करावे लागले. या कारखान्यात जवळपास ४० सिलेंडर भरलेले होते. अग्निशमन विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या लक्षात हा प्रकार येताच त्यांनी हे सर्व सिलेंडर बाहेर काढले. यामुळे मोठा अपघात टळला. अशोक परिमल ग्रुपच्या मोरारजी टेक्सटाईल्स लिमिटेड कंपनीने सन २००३ पासून नागपुरात कापड उत्पादनास सुरुवात केली. आठ वर्षांत या कंपनीने महाराष्ट्रासह अन्य राज्यांसह विदेशातही प्रसिद्धी मिळविली. साऊदी अरब, न्यूझीलंड, इराक, ऑस्ट्रेलिया, अमेरिका, सिंगापूर, दुबईसह अन्य देशांमध्ये या कंपनीतील कापड पाठविण्यात येते. सन २००१ मध्ये आयएसओ प्रमाणपत्र मिळालेल्या या कंपनीला सन २०१४ चेही आयएसओ प्रमाणपत्र मिळाले आहे. युनिट क्र. जी-२ मध्ये महाभवानीचे कंत्राटदार आणि इंद्रजित इंजिनिअरिंग कन्सलटन्सी हे आठ वर्षांपासून कंत्राटदारी पद्धतीने काम करतात. युनिट क्र. २ मध्ये एकूण ३ हजार कामगार तीन पाळीत काम करतात. एका पाळीत एक हजार कामगार असतात. या ठिकाणी कापड पेंटिंग, ड्राईंग, स्पेनिंग, विविंग व फोल्डिंगची कामे केली जातात. आज मंगळवारी सकाळी ग्रे डिपार्टमेंटच्या एसीत शॉर्टसर्किट झाल्याने युनिटमध्ये आग लागली. सर्वत्र कापडांचे गठ्ठे असल्याने आगीने काही वेळातच भीषण रूप धारण केले. आग लागल्याचे दिसताच कर्मचाऱ्यांमध्ये पळापळ सुरू झाली. जीव वाचविण्यासाठी कर्मचारी मिळेल त्या मार्गाने कंपनीबाहेर पडण्यासाठी धडपडत होते. एक कर्मचारी आगीच्या भक्ष्यस्थानी सापडला. बचावासाठी त्याने कार्यालयातील काच फोडून बाहेर उडी मारली. यात तो किरकोळ जखमी झाला. या आगीत जवळपास लाखो मीटर तयार कापड, कच्चा माल, मशिनरीज व कार्यालयीन कागदपत्रे जळून खाक झाले आहे.

देशोन्नती
नागपूर

# मोरारजी टेक्सटाईल्समध्ये कोट्यवधींची हानी, अग्निशमन यंत्रणेच्या अभावामुळे वाढले नुकसान

*तालुका प्रतिनिधी/१७ मे*

**हिंगणा :** आशिया खंडातील सर्वात मोठ्या पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रातील मोरारजी टेक्सटाईल्स कारखान्याला शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याने कोट्यवधी रुपयांचे कापड, यंत्रसामुग्री व कार्यालयीन साहित्य जळून खाक झाले. ही घटना आज (दि.१७) सकाळी ७.३० वाजताच्या दरम्यान घडली.



या कारखान्याच्या कार्यालयात विद्युत प्रवाह सुरू असताना शॉर्ट सर्किटमुळे कुलिंग डक्टींगमधील कापसापासून ही आग सुरु झाली. अवघ्या अर्धा तासात कार्यालयातील सर्व वहीखात्यासह साहित्य, सहा संगणक, सुमारे १३ लाख मीटर तयार कापड, कच्चा माल, यंत्रसामुग्री व कुलिंग डक्टिंग या आगीत जळून खाक झाली. यात कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे.

४० सिलिंडर वेळीच बाहेर काढल्याने अनर्थ टळला

ही घटना सकाळी कार्यालय सुरू होण्यापूर्वी घडल्यामुळे व हिंगणा एमआयडीसी अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनी कारखान्यात ठेवलेले ४० गॅस सिलिंडर सतर्कतेने लगेच बाहेर काढले. त्यामुळे मोठी प्राणहानी टळली. रात्रपाळीतील सुरक्षा रक्षकांना कार्यालयातून धूर बाहेर येताना दिसल्यामुळे घटनेची माहिती कारखान्यातील वरिष्ठ अधिकारी, पोलिस स्टेशन बुटीबोरी, अग्निशमन विभाग यांना देण्यात आली. सकाळी ८ वाजताच्या दरम्यान विभागीय अग्निशामक अधिकारी एम.आर. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली अग्निशामक केंद्र हिंगणा एमआयडीसी, बुटीबोरी एमआयडीसी, इंडोरामा कंपनी, मनपा नागपूर आदी ठिकाणच्या अग्निशमन ➤पान ४ वर

## मोरारजी टेक्सटाईल्समध्ये ...

विभागाच्या कर्मचाऱ्यांनी तारेवरची कसरत व जीव मुठीत घेऊन आग विझविली. या कारखान्यामध्ये संकटकालीन परिस्थितीत संकटावर मात करण्यासाठी अग्निशमन यंत्रांची तसेच वैद्यकीय सेवेची सोय नियमाप्रमाणे नसल्याची चर्चा अग्निशामक दल अधिकारी व कारखान्यातील कर्मचाऱ्यांमध्ये होती. ही घटना घडून दोन तास लोटल्यानंतरही कारखान्यातील जबाबदार अधिकारी किंवा पदाधिकारी घटनास्थळी न आल्यामुळे झालेल्या नुकसानीबाबत अधिकृत माहिती मिळू शकली नाही. आगीवर नियंत्रण आणण्याचे कार्य विभागीय अग्निशामक अधिकारी एम.आर. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली अग्निशामक अधिकारी बी.जी. काळे, ए.जी. सरवदे, बी.जी. शिंदे, एस.यु. गेडाम, एस.आर. राऊत, आर.डी. साखरे, डी.एस. पाचुणे, एन.जी. जाधव, आर.के. वेलुरकर, सपाटे, मंगेश गावंडे, पी.शेंडे, एच.एन. झाडे आदींनी केली आहे. बुटीबोरी पोलिसांनी घटनेची नोंद केली असून ठाणेदार राजपूत तपास करीत आहेत.

नवभारत



# मोरारजी मिल में भीषण आग

## ■ एडमिनिस्ट्रेटिव ब्लाक, यूनिट नं. 2 जलकर खाक

संवाददाता

**बूटीबोरी.** मंगलवार को बूटीबोरी एमआईडीसी स्थित मोरारजी ब्रेबार्न मिल्स में लगी भीषण आग में कंपनी का एडमिनिस्ट्रेटिव ब्लाक, यूनिट नं. 2 (आईसी), रा मटेरियल व गोडाउन जलकर खाक हो गए. सुबह 8 बजे की शिफ्ट में काम करने आए कुछ मजदूरों को एडमिनिस्ट्रेटिव ब्लाक से धुआं उठते हुए दिखा. उन्होंने तुरंत कंपनी के अधिकारियों को सूचना दी. सूचना मिलते ही मिल में उपस्थित अधिकारी घटनास्थल पर पहुंचे लेकिन तब तक आग ने पूरे एडमिनिस्ट्रेटिव ब्लाक को लपेटे में ले लिया था.

### छत के लोहे के गर्डर पिघले

कामगारों व अधिकारियों ने आग बुझाना प्रारंभ किया लेकिन आग की विभीषिका के आगे सभी असहाय थे. एडमिनिस्ट्रेटिव ब्लाक में रिसेप्शन, अकाउंट विभाग, कम्प्यूटर, रिकार्ड था, जो पूरी तरह जलकर खाक हो गया. देखते ही देखते आग अन्य विभागों में फैल गई. आग में यूनिट क्र. 2 जिसे इंद्रजीत इंजीनियरिंग कंसल्टंसी (आईसी) के नाम से जाना जाता है व मिल परिसर में रखा रा मटेरियल, गोडाउन स्वाहा हो गया. आग इतनी भीषण थी कि उससे छत के लोहे के गर्डर पिघलकर नीचे आए. छत में लगाया गया डामर पिघलने से आग और भड़क गई. प्रत्यक्षदर्शी के अनुसार छत से डामर टपक रहा था.

### 6 दमकलों ने किया बचाव कार्य

आग की सूचना मिलते ही बूटीबोरी एमआईडीसी की 2 दमकलें तत्काल घटनास्थल पर पहुंची. आग की भीषणता देखते हुए इंडोरामा, हिंगना से 1-1 व नागपुर मनपा से 2 दमकलें बुलाई गईं. सुबह 7.30 बजे लगी आग करीब 8 घंटे बाद दोपहर 3 बजे काबू में आई. घटनास्थल पर बूटीबोरी के नए थानेदार राजपूत, पीएसआईद्वय राठौड़, शिंदे व पूरे दल-बल के साथ घटनास्थल पर पहुंचे.

### उत्पादन प्रभावित

कंपनी के एडमिनिस्ट्रेटिव इंचार्ज भोंरे ने बताया कि आग बुझाते वक्त पानी की बौछारों से स्पिनिंग व विविंग मशीनरी को नुकसान पहुंचा है. आग में गोडाउन, रा मटेरियल व पूरा रिकार्ड जल गया. उन्होंने कहा कि आग के कारण मिल में उत्पादन प्रभावित हुआ है. उत्पादन शुरू होने में 1 सप्ताह लग सकता है. आग के कारणों का पता नहीं चला.

### तो बढ़ सकती थी आग की भीषणता

मिल परिसर में करीब 2,000 ली. मिट्टी तेल संग्रहित कर रखा गया था. उसी प्रकार कुछ गैस सिलेंडर भी थे. दमकल कर्मियों के समय पर पहुंचने व आग को फैलने से रोकने से आग वहां तक नहीं पहुंची अन्यथा आग की भीषणता बढ़ सकती थी. आग में कोई प्राणहानि नहीं हुई.